सचिन बिजुटकर

# जमलं तर



# जमलं तर!

## हे पुस्तक विनामूल्य आहे
## पण फुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# जमलं तर!

(नाट्कली)

## लेखक :

## सचिन अरुण बिजुटकर

लेखकाची ओळख-

**सचिन अरुण बिजुटकर**

संपर्क - बी विंग - 306, राज सुंदराम सोसायटी, अशोक वन, दहिसर पूर्व, फोन - 9820828606

sachin. bijutkar@gmail. com



**माझे हे पहिले पुस्तक आहे. मला हसायला आणि दुसऱ्यांना हसवायला खूप आवडते. त्यातूनच या पुस्तकाचा जन्म झाला आहे. तर खूप हसा आणि मजा करा. प्रेक्षकांच्या चेहऱ्यावरचे हसू हेच माझे श्रेय आहे.**

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

www. esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841

APP :

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन : ३१ ऑगस्ट २०१८**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

या कथे मधील सर्व पात्रे घटना काल्पनिक आहेत जर चुकून याचा कुठे संबंध आलाच तर तो  निव्वळ योगायोग समजावा. यात कुणाच्या भावना दुखावण्याचा कोणताही उद्देश नाहीच.

# जमलं तर!

एका लग्नापूर्वीची गोष्ट

मित्रानो, ही एक काल्पनिक कथा आहे, तेव्हा खुप हसा आणि मजा करा आणि माझ्या सर्व ऱ्हस्व-दीर्घ चुकांना क्षमा करा. आवडलं तर चारचौघांना सांगा. नाही आवडलं तर – असं होणारच नाही.

ही एक सिच्युएशन आहे. एक लग्नाळू मुलगा मुलगी बघायला जातो. दर वेळेप्रमाणे कांदे पोहे दिले जातात. सगळे जण पोहे खातात. इकडच्या तिकडच्या गोष्टी होतात.

मग मुला-मुलीला एकांतात बसवले जाते.

अर्ध्या तासात दोघेही बाहेर येतात. दोघेही नंतर कळवतो म्हणून सांगतात आणि मुलाकडची मंडळी जातात.

ते गेल्यावर मुलीकडच्या मंडळींमधील हा संवाद.

आई - काय ग चिंगे, कसा वाटला मुलगा?

चिंगी - अग त्याला पोह्याबरोबर लिंबू पिळायला दिला होता ना, तो पिळल्यावर त्याने बोटं चाटली. मग पोहे खाल्ले.

आत्या - (डोळे मिचक्या मारीत) अग, आंबटशौकीन असेल.

(हशा)

चिंगी - मला नको असा मुलगा.

आई - अग अशी किती मुले नाकारणार आहेस तू?

आत्या - अग आताशी तर हाफ सेंच्युरी झाली आहे, अजून तर सेंच्युरी व्हायची बाकी आहे. (हशा)

आई - तुम्ही थांबा हो वन्सं, आता या मुलात काही वाईट आहे चिंगे? एवढा मोठ्या पदावर आहे. उंची सुद्धा सहा फुटी आहे. घराणं सुद्धा छान आहे. सासू सासरे तर नाहीच आहे. मुलाची बहीण पण वीस वर्षे मोठी आहे. कधी पण खपेल. मोठं घर आहे. आणि काय सुख पाहिजे तुला?

चिंगी - तसं नाही ग आई, उसमे वो बात नहीं हे.

आत्या - आता हिला कसला ऊस पाहिजे, कोणास ठाऊक?

चिंगी - तसं नाही आत्या, त्याच्यामध्ये काहीतरी स्पार्क पाहिजे. तो मला दिसत नाही.

आई - अग लग्नानंतर दिसेल की तो स्पार्क.

चिंगी - आणि नाही दिसला मग काय त्याला सोडून दुसरं लग्न करु?
आई - अग असे किती दिवस तू स्पार्क शोधत बसणार आहे?
आत्या - हिला ना तू एखादा इलेक्ट्रीशिअन शोधून दे बाई. त्याच्याकडे भरपूर स्पार्क असतात. हिला पण तो एक दोन शॉक लावून स्पार्क देईल. म्हणजे हिला कळेल.

(हशा)
तशी पण तू खुप जड झाली आहेस.
चिंगी - मी तुम्हाला जड झाली आहे का?

आत्या - आम्हाला नाही गं. तुझं वजन वाढलं आहे ना. त्याने एक दोन स्पार्क दिल्याने कमी होईल कदाचित. म्हणून म्हटलं

चिंगी - एवढं कुठे हो माझं वजन झालं आहें, आई बघ ना.
आई - जाऊ द्या हो वन्स.
आत्या - मी जाऊ देते. आताच तू सत्तरीला पोहचली आहेस.
चिंगी - सत्तरीला?

आत्या - म्हणजे तुझं वजन सत्तर आहे ना. ते काही तुला कमी करता येत नाही अजून. म्हणून सांगते, लवकर लग्न कर. अश्या छोट्या छोट्या कारणाने मुलं नाकारायला लागलीस की मग मुलंच तुला नाकारायला लागतील.

चिंगी - हे काय छोटं कारण आहे? माझ्या आयुष्याचा प्रश्न आहे.
आई - मग अर्धा तास आतमध्ये बसून काय बोलत होतीस?
चिंगी - काही नाही. इकडच्या तिकडच्या गप्पा.
आत्या - स्पार्क शोधत बसली असेल.
आई - खरं कारण सांग चिंगे. तुझं काही बाहेर असेल तर सांगून टाक. म्हणजे आम्ही पण मोकळे आणि तू पण.

चिंगी - तसं काही नाही आहे.
आई - मग तुला लग्नच करायचेय नाही का?
चिंगी - मला करायचं आहे.
आई - मग अशी मुलं का नाकारतेस? परवाचा तो मुलगा. चप्पल घालून आला, म्हणून तू नाकारलास. मागच्या आठवड्यात आलेला मुलगा, किती सुंदर होता तो. त्याने फक्त एकच प्रश्न विचारला.
तुझे काही जुने अफेअर वैगेरे होते का.
या एका प्रश्नावरून तू त्याला नाकारलास.
नक्की तुला मुलगा कसा पाहिजे?
आत्या - आता एक राजकुमार घोड्यावरून येईल आणि मला घेऊन जाईल, असं वैगेरे काही सांगू नकोस हं. आजकाल घोडे खूप महाग झाले आहेत आणि त्या राजकुमाराला तो बोटं चाटतो म्हणून तू नाही सांगितलंस तर मग तो घोडयाचं भाडं आपल्याकडून घेईल. आधीच महिन्याला सात आठ किलो पोहे लागतात आपल्याला. त्यावर नवीन खर्च नको.

चिंगी गप्प

आई - काय झालं चिंगे, गप्प गप्प का, सांग ना कसा मुलगा पाहिजे तुला?
चिंगी - मला नाही माहीत. म्हणजे ना त्याला बघताच, पहिल्या क्षणातच तो आवडला पाहिजे. असा मुलगा पाहिजे.
आत्या - अग हे काही कॉलेज नव्हे, love at first sight करायला. इथे आपण फक्त मुलगा पारखून घ्यायचा असतो आणि बाकी सगळे देवावर सोडायचे असते आणि लग्नानंतर प्रेम करायचे असते.
चिंगी - आपण एवढी रिस्क कशी घेणार. आणि काय बिनसलं म्हणजे?

आत्या - याच्यावर काही उपाय नाही. आपल्याला रिस्क घ्यावीच लागले. आम्ही नाही घेतली रिस्क? आणि आमचं काय बिनसलं?

चिंगी - तुमचा काळ वेगळा होता. आमचा काळ वेगळा आहे.

आत्या - काळ कुणाचाही असो. लग्न म्हटल्यावर रिस्क ही असतेच. आणि ती घ्यावीच लागते. परवा ते निळे काका. आपले मध्यस्ती काय म्हणाले तुझ्या पप्पाला माहीत आहे?

चिंगी - काय

आत्या - ते म्हणाले, तुमच्या मुलीला माणसाशीच लग्न करायचे आहे ना? नाहीतर पुढच्या वेळेस एखादं माकड घेऊन येतो.

इकडे मूलाकडची मंडळी स्वतःच्या घरी येतात. मंडळी म्हणजे मुलगा आणि त्याचे काका.

काका - काय रे पिंट्या, कशी वाटली पोरगी.

पिंट्या - छान आहे. तिचे केस पण खूप छान आहे.

काका - पोरींचे केस कितीही छान असले तरी जर ते ताटात आले की ढुंगणखाली दाबून जेवावे लागते.
त्यामुळे तिच्या केसांची सुंदरता मला नको सांगु.
(हशा)

पिंट्या - काय हो काका!

काका - म्हणजे तुला पोरगी पसंत आहे?

पिंट्या - ते नाही माहीत. पण मला ती आवडली.

काका - म्हणजे, मला कळेल असे काहीतरी बोल.

पिंट्या - मुलगी मला आवडली. पण तिच्याबरोबर लग्न करायचे की नाही, हा प्रश्न मला पडला आहे.

काका - तुमच्या पिढीचं हेच मला कळत नाही. प्रत्येक सोप्या गोष्टीला तुम्ही अवघड करून ठेवता आणि मग द्विधा मनस्तीती होते. आणि धड पुढेही जात नाही आणि धड मागेही येत नाही. नेहमी तुम्ही लोक तळयात मळयात, तळयात मळयात असतात आणि स्वतःच स्वतःच्या मार्गात येतात. सरळ सांग, हो की नाही.

पिंट्या - मला थोडा वेळ लागेल.

काका - किती

पिंट्या - आठ दिवस.

काका - ठीक आहे. आता मी निघतो. मला फोन करून कळव तुझा निर्णय. म्हणजे मी निळे भाऊंना कळवतो.

पिंट्या - एवढ्या लवकर जाता काका. एक दिवस तरी थांबा.

काका - नकोरे बाबा. घरी खूप काम आहेत. आणि तुझी काकी बोंबा मारेल ते वेगळं. तुझं लग्न एकदा ठरलं ना की मी एक महिना येऊन राहणार आहे बघ. म्हणजे लग्नांनंतर नाही, आधी. मग तुलाच माझा कंटाळा येईल. आणि म्हणशील, काका, येता का आता

पिंट्या - मुळीच नाही. तुम्ही कितीपण दिवस माझ्याकडे राहू शकता.

काका - फक्त लग्न होईपर्यंत. काय!

पिंट्या - लग्नानंतर सुद्धा, तुम्हीच मला लहानपणापासून संभाळलंय ना.

काका - बस, आता पुन्हा सुरु नको होऊस.

पिंट्या - ठीक आहे. मग थांबताय ना आज. नाहीतर मी परत सुरु होइन.

काका - तू काही मला, तुझ्या काकीच्या शिव्या खाल्ल्याशिवाय सोडणार दिसत नाही वाटत.

पिंट्या - मी बोलु का काकींशी?

काका - ती तुला सांगेन, एक काय चार दिवस राहूदे त्याना. पण नंतर मी घरी गेल्यावर........ माहीत आहे ना तुला.

पिंट्या - थांबा. मी बोलतो.

पिंट्या फोन लावतो आणि एक दिवसाची परवानगी घेतो.

पिंट्या - झालं, तुम्ही आता परवा जा. काकी खुप चांगल्या आहेत. तुम्ही उगाच मला त्यांच्याबद्दल काहीपण सांगता.

काका - म्हणून सांगतो. लवकर लग्न कर. म्हणजे तुला बायकांचे पैत्रे कळतील.

पिंट्या - हो. पण नीट मुलगी तर मिळायला पाहिजे ना.

काका - नीट मुलगी म्हणजे नक्की कशी मुलगी हवी आहे तुला?

पिंट्या - ती मनाने चांगली पाहिजे. मला समजून घेणारी. एक तर तसं बघायला गेलं तर मी एकटाच आहे. तुम्ही वर्षातुन तीन चार वेळा येता आणि ताई पण तीन चार वेळा. पुर्ण वर्ष मी एकटाच असतो.

काका - हे बाकी खरं हं. पण अशी पोरगी मिळणार कुठे? आपण प्रयत्न भरपुर करतो आहोत. तश्या सर्वच पोरी चांगल्या असतात, पोरीची बाई झाल्यावर खरा रंग कळतो. पण आजची पोरगी मला पण आवडली. तू पटकन निर्णय घ्यावा असं मला वाटत. या बाबतीत जास्त विचार करुन काही फायदा होत नाही. फक्त वेळ वाया जातो.

पिंट्या - ठिक आहे. आम्हाला परत भेटता येईल का?

काका - अरे वेळ दिला होता की. तुम्ही दोघं अर्धा तास बोलत होतात की.

पिंट्या - मला अजून वेळ पाहिजे.

काका - तुला जे विचारायचे ते अर्ध्या तासात नाही विचारले का?

पिंट्या - मला काय विचारायचे होते ते मी ठरवलेच नव्हतं.

काका - मग तेव्हा काय पोलिटिक्स आणि क्रिकेट बद्धल बोलत होतात, की हवामान खात्याचा अंदाज घेत होतात?

पिंट्या - मला तिला काही खास विचारायचेच न्हवते. म्हणून आम्ही फक्त गप्पा मारत होतो.

काका - अरे गप्पा मारायला ते काय कॉलेजचे कॅन्टीन होते का लेका. आणि आता काय खास विचारणार आहेस?

पिंट्या - आता मला विचारायचं आहे, की तिला अपेक्षित नवऱ्याकडून काय अपेक्षा आहे?

काका - आता परत भेटायला बोलावलं तर त्यांना वाटेल तुला मुलगी पसंत आहे. म्हणून परत बोलावतो आहेस. लहानपणापासून तू असाच वेंधळा आहेस. वेळ निघून गेल्यावर बोलतोस.

पिंट्या - मला नंतर सुचतं त्याला मी तरी काय करु.

काका - आता तू काहीही करु नकोस. मी बोलतो निळे भाऊंशी.

पिंट्या - आता नका फोन लाऊ. दोन दिवसांनी लावा.

काका - का?

पिंट्या - त्यांना वाटेल आपल्याला घाई आहे. म्हणून.

काका - अरे, आपल्याला घाई आहेच.

पिंट्या - हो, पण ते त्याना कळायला नको ना.

काका - का, कळलं तर काय होईल?

पिंट्या - तसं नाही. आपण त्यांच्या फोनची वाट बघु दोन दिवस. त्यांचा फोन नाही आला तर मग आपण फोन लाऊ.

काका - त्याने काय होईल?

पिंट्या - म्हणजे आपल्याला कळेल की त्याना पण गरज आहे ते.

काका - अरे, गरज दोन्ही बाजूने असते. आपण आपली गरज दर्शवयाची. त्याना गरज असेल तर ते पोरीला परत भेटायला पाठवतील. गरज नसेल तर नाही म्हणून सांगतील. इतका सोपं गणित आहे. उगाच यांच्यामध्ये complications नको आणु.

पिंट्या थोडा विचार करून होकार देतो. निळे भाऊंना फोन लावला जातो आणि ते सांगतात की मी मुलीकडच्या मंडळींना विचारून सांगतो.

इकडे चिंगीच्या घरी फोन येतो.

आई - अग चिंगे, कळलं का तुला, मुलाला परत भेटायचं म्हणे.
चिंगी - हो कळलं.
आई - मग आता काय तुझं मत आहे.
चिंगी - काही कळत नाही. जाऊ की नको जाऊ.
आत्या - अग जा. बघ तर काय म्हणतो आहे. कदाचित तू त्याला आवडली असशील. म्हणून परत बोलावणं आलं असेल.
चिंगी - अगं, पण माझं मत?
आत्या - कदाचित तुला पण तो आवडायला लागेल. आणि तरी पण तुला नाही आवडला. तर आम्ही काय तुझ्या मताबाहेर आहोत का? तसं निळे काका दुसरी स्थळ शोधत आहेतच. माकडं का होईना.
चिंगी - आत्या?
आत्या - सॉरी. सॉरी
चिंगी - पण भेटायचं कुठे हे सांगितलेच नाही.
आत्या - तू फक्त हो म्हण. बाकी सगळे तो ठरवेल आणि सांगेल.
चिंगी - चालेल. मी तयार आहे.

आत्या - अरे वा. या वेळेस पटकन तयार झालीस. चांगली गोष्ट आहे. मी पटकन निळे काकांना फोन लावायला सांगते तुझ्या पप्पाला.

चिंगी तिथुन निघून गेल्यावर

आई - बरं झालं बाई. चिंगी हो तरी म्हणाली.

आत्या - हो ना. त्या हॉटेल मध्ये त्या मुलाने पोहे मागवले नाही म्हणजे मिळवलं.

आई - सहसा कोणी पोहे वैगेरे मागवत नाही हॉटेल मध्ये.

आत्या - बरं. आपल्या चिंगीला पण सांग. काय बोलायचं, काय नाही ते. उगाच वेळ वाया न घालवता मुद्यांचे बोलायला सांग. तशी ती हुशार आहे. पण कधी कधी त वरून ताकभात ओळखायचा सोडून त वरून तपेलं ओळखते.

(हशा)

आई - या वेळेस हिचं जमु दे देवा. मी जेजुरीला चालत येईन नमस्काराला.

आत्या - वा, काय नवस बोलली आहेस राधे. आपल्या घरापासून जेजुरी दोन किलोमीटर पण नाही आहे. म्हणे चालत येईन.

आई - म्हणून तर म्हटलं.

आत्या - हो का, जसं काय त्या खंडोबाला माहीतच नाहीय आणि तू गेल्यावर त्याला वाटेल खूप लांबून आली आहे ही बाई. तसं तुझ्यासाठी दोन किलोमीटर म्हणजे नवसच आहे म्हणा. साधं भाजी घ्यायला, नाक्यावर जायला तुला scooty लागते.

आई - ते राहुद्या. यांना फोन करा पटकन.

आत्या - अग हो. करते.

मग आत्या चिंगीच्या पप्पाला फोन करते. आणि मग निळे काकांना कळवले जाते. आणि पुन्हा भेटण्याची वेळ आणि हॉटेल नक्की होते.

काका - अरे वा. उद्याच पुन्हा भेटायचं ठरलं तर. बरं झालं मी थांबलो ते.

पिंट्या - हो उद्या रविवार पण आहे. नाहीतर पुढच्या सुट्टीपर्यंत थांबावं लागलं असतं.

काका - मी पण येईन हा तुझ्याबरोबर.

पिंटया - तुम्ही पण?

काका - म्हणजे अगदी तुमच्या बरोबर नाही बसणार. थोडा लांब बसेन. चालेल का तुला.

पिंट्या - मला चालेल. मयुरीला चालेल की नाही, माहीत नाही.

काका - अरे वा. नाव पण पाठ झालं तुझं. चांगलीच प्रगति आहे.

पिंट्या - (हसत) , त्यात काय एवढं

काका - तुला चालेल ना मग त्या पोरीला म्हणजे मयुरीला पण चालेल.

पिंट्या - ठीक आहे.

काका - मला उद्या मोठी पार्टी मिळणार तुमचं ठरल्यावर.

पिंट्या - आधी ठरु तर द्या.

काका - तुझ्या बाजुने हे स्थळ पक्क आहे. फक्त पोरीने हो म्हटलं पाहिजे.

पिंट्या - तिचं नाव माहीत आहेना. मग पोरगी, पोरगी काय करता. आणि माझ्या बाजुने स्थळ पक्क कुठे झालं अजून.

काका - (जोरात हसून), अशीच तुझी फिरकी घेतली. आणि हे तू बोललास त्यावरून समजतं की तुला ती पसंत आहे. वा रे लेका. अजून लग्न ठरलं पण नाही आणि आत्तापासूनच तू तिची बाजु घ्यायला लागला की.

पिंट्या - आहो मी तिची बाजु कुठे घेतोय. फक्त तुम्ही पोरगी म्हणालात ना, म्हणून बोललो.

काका - ठीक आहे. मी शुद्ध मराठीत बोलत जाईन. लग्नानंतर तुझं काय होणार देव जाणे.

पिंट्या - काय होणार?

काका - तुझं काही नाही रे. आम्हाला शुद्ध मराठी बोलायचा क्लास करून यावं लागेल. आम्ही काय गावाकडची माणसं. आमचं वागणं नवीन सूनबाईला आवडत की नाही हे बघायला नको?

पिंट्या - तसं काही नाही आहे. तिला आवडेल सगळं.

काका - असं. बराच confidence आहे तुला मुलीबद्दल. सॉरी, मयुरी बद्द्ल. अर्ध्या तासात बरंच ओळखलं दिसतंय.

पिंट्या - काका. आता तुम्ही माझी खेचताय.

काका - बरं बरं राहीलं. आता नाही काही बोलत. पण मला एक सांग, राहिलं, शुद्ध मराठीत बोललं तर चालतं का रे 😊☺😊☺

पिंट्या - काका.

काका - अरे खेचत नाही. असंच कुतुहल म्हणून विचाराल.

पिंट्या - हो, चालतं.

काका - मला उद्याची खुप उत्सुकता लागली आहे.

पिंट्या - तुम्ही तर लांब बसणार, तुम्हाला कसली उत्सुकता?

काका - त्याबद्दल नाही रे. उद्या कुठच्या डिशेस मागवायच्या त्याबद्दल.

पिंट्या - काका, त्यात काय. जे पाहिजे ते मागवायचं.

काका - एवढया मोठ्या हॉटेल मध्ये जायची मला सवय नाही. तिथे कस वागायचं. काय मागवायच, मागवलेलं कसं खायचं. तिकडची शिस्त कशी आहे. हे सगळं माहीत नव्हतं का? आणि सगळे जण म्हणतात माझा आवाज खुप मोठा आहे आणि मी हसतो पण जोरजोरात. आता हळू कसं बोलायचं, हे समजत नाही बघ.

पिंट्या - मी सगळं शिकवेल तुम्हाला.

काका - आणि माझं वागणं मयुरीला खटकलं म्हणजे? नको नको. त्यापेक्षा तू एकटाच जा. मी घरी थांबतो.

पिंट्या - एक काम करू. आज रात्री आपण तिथेच जाऊ जेवायला. तिथे मी तुम्हाला सगळं शिकवतो. मग तर झालं?

काका - नकोरे, एवढ्या महागातल्या हॉटेल मध्ये दोनदा दोनदा !! तुझी काकी माझं खोबरे करेल, तिला तर मी वर्षांनुवर्षे कुठल्याही हॉटेलमध्ये घेऊन जात नाही. फक्त तुझ्याकडे येतो तेव्हाच आम्ही हॉटेलचं तोंड बघतो.

पिंट्या - मग आता पण चला ना.

काका नको नको सांगून सुद्धा पिंट्या त्यांना त्या हॉटले मध्ये घेऊन जातो आणि सगळ्या हॉटेलच्या गोष्टी शिकवतो आणि जेवण करुन दोघे जण घरी येतात.

पिंट्या - कसं वाटलं जेवण?

काका - ते काय जेवण होतं. सगळं मिळमिळीत. जरासुद्धा तिखट न्हवतं. भात त्यातल्यात्यात बरा होता.

पिंट्या - तो पुलाव होता. आणि हॉटेल मध्ये असंच मिळतं.

काका - मग त्यांनी पैसे पण कमी लावायचे ना. सगळा खर्च काय फक्त A/C , टेबलं आणि टाय लावण्याऱ्या वेटरवर केला आहे का?

पिंट्या - जाऊद्या ओ काका.

काका - उद्या त्या मयुरीला असं हॉटेल आवडेल का?

पिंट्या - हो मग. आणि उद्या काही तेथे जेवायचं नाही आहे. संध्याकाळी बोलावलं आहे.

काका - बरं तुझी उद्याची तयारी झाली का?

पिंट्या - कसली तयारी?

काका - अरे तुला काय काय प्रश्न विचारायचे आहेत तिला. त्याची तयारी.

पिंट्या - चार- एक प्रश्न मनात आहे माझ्या. बाकीचं तिकडे गेल्यावर बघु.

काका - बघु काय बघु. तिला बघितल्यावर सगळं विसरून जाशील.

पिंट्या - काहीपण हा काका.

काका - ही शेवटची संधी आहे. सगळं विचारून टाक. नंतर म्हणू नको. हे राहिलं. ते राहिलं. जमल्यास सगळे प्रश्न हातावर लिहुन ठेव.

पिंट्या - ही काय शाळेतली परिक्षा आहे?

काका - हो तर. शाळेत हातावर उत्तरं लिहुन ठेवायचा. आत प्रश्न लिहून ठेव. तेव्हा पण तू उत्तर तर लिहायचा. पण परीक्षेला हे कुठच्या प्रश्नाचं उत्तर आहे, हेच तुला कळायचे नाही. ( हा हा हा असे म्हणून जोरात हसतात) आता तशी गफलत करू नकोस.

पिंट्या - आता नाही होणार तसं. मी सगळं व्यवस्थित विचारेन. आणि तुम्ही हळूहळू हसा. एवढया जोरात हसलात तर ती पळून जाईल.

काका - हळू कसं हसतात मला दाखव बघु?

पिंट्या - मला नाही दाखवता येत.

काका - मग, म्हणून मी उद्या येणारच नाहिये. तसं पण मी वेगळ्या टेबलावर बसून एकटा काय करणार.

पिंट्या - नको नको. तुम्ही या. माझा कॉन्फिडन्स वाढेल.

काका - अरे आतापासून भितोस की काय होणाऱ्या बायकोला?

पिंट्या - काका......

काका - बरं, बरं. मी येतो. आपल्याला काय. कोल्ड्रिंकमध्ये नळकांड टाकुन गुडगुड आवाजच तर करायचा आहे.

पिंट्या - नको, नको. तसला आवाज करण्यापेक्षा तुम्ही ice-cream मागवा.

काका - अरे ice-cream मागवलं तर ते पटकन खावं लागतं नाहीतर ते विरघळून जाईल ना. आणि timepass कसा होईल.

पिंट्या - एक संपलं की दुसरं मागवा. जो पर्यंत आम्ही बसलेलं आहोत तो पर्यंत मागवतच रहा. पण तो गुडगुड आवाज नको.

काका - चालेल. जशी तुझी इच्छा.

दुसऱ्या दिवशी चिंगीच्या घरी.

आई - चल चिंगी तयारी कर. तुला जायचंय ना?
चिंगी - कुठे?
आई - त्या कालच्या मुलाला भेटायला.
चिंगी - ते तर संध्याकाळी. आता पासून काय तयारी करायची?
आई - तसं नाही. काय काय विचारणार आहेस त्याला. ते ठरवलंस का?
चिंगी - त्याने पुन्हा बोलावले आहे. तो विचारेल ना. मी काय विचारू?
आई - तुझ्यापण मनात काय असेल ते विचारून घे.
चिंगी - मला काही नाही विचारायचं.

तेवढ्यात आत्या येते.

आत्या - काय नाही विचारायचं?
चिंगी - मला काहीच नाही विचारायचं.
आत्या - अग पण कोणाला?
चिंगी - त्या कालच्या मुलाला.
आत्या - ठीक आहे. मग नंतर खुच्पट काढु नकोस.
चिंगी - म्हणजे?
आत्या - त्याला नाकारण्याची कारणे आम्हाला देऊ नकोस.

चिंगी - मला तो पसंत आहे की नाही ते अजून मी ठरवलेलं नाही. मला स्थळ पसंत आहे असे समजून चालू नका.

आत्या - नाही चालणार हो. राधे. या वेळी पण ही काहीतरी गडबड करणार वाटत. हिच्याबरोबर कोणालातरी पाठवावे लागेल.

चिंगी - त्याची काहीही गरज नाही. मी स्वतःला सांभाळायला समर्थ आहे.

आत्या - तुझ्यासाठी नाही ग. त्या मुलासाठी.

चिंगी - का. मी काय त्याला खाते की काय? मी एकटीच जाणार.

आत्या - चालेल. तू कोणाचं ऐकलं आहेस आतापर्यंत.

आई - बरं. कपडे काय घालणार आहेस?

आत्या - जीन्स आणि टी शर्ट. दुसरं काय.

चिंगी - ते काय मी ठरवलेलं नाही. पण आत्याचा चॉइस चांगला आहे.

आत्या - अग बाई. जरा हिला बघ राधे. मी जाते पुजा करायला.

आई - ठीक आहे.

मग आई चिंगीला तयार करते आणि संध्याकाळी ते दोघे होटलेमध्ये भेटतात. रात्री आठ वाजता चिंगी घरी येते.

आई - (उत्सुकतेने) काय झालं चिंगे. आणि एवढा उशीर का झाला?

चिंगी - कुठे काय. उशीर ना. आम्ही बोलत बसलो होतो. त्यामुळे वेळ कसा गेला कळलंच नाही.

आई - मग काय बोलला मुलगा?

चिंगी - आमचं बऱ्याच विषयांवर बोलणं झालं आणि आम्ही ठरवलंय. (तेवढ्यात तिथे आत्या येते ).

आत्या - अरे वा. ठरलंय. राधे, देवापुढे साखर ठेव आणि आता पुढची बोलणी करायला सुरुवात करायला हवी. त्याना लग्न कुठे करून हवंय. वैगेरे, वैगेरे.

चिंगी - हो हो. अग थांब आत्या.

आत्या - आता थांबण्यात वेळ वाया घालवून चालणार नाही. आधी मुहूर्त शोधावा लागेल.

चिंगी - आधी माझं ऐकून तर घे.

आत्या - हा बोल. तुला काय पाहिजे माझ्यकडुन. हार की बांगड्या?

चिंगी - ते नंतर. आम्ही असं ठरवलंय की पुन्हा कुठे आणि किती वाजता भेटायचं ते.

आई - आता पुन्हा कशाला भेटायचं आहे?

आत्या - अग तिला भेटायचं तर भेटुदे.

आई - तुम्ही थांबा हो वन्स. चिंगे, आता तू लग्न ठरल्यावरच भेट.

चिंगी - त्यासाठीच तर पुन्हा भेटायचं आहे ना.

आई - म्हणजे?

चिंगी - आम्ही अजून ठरवलेलं नाही की लग्न करायचे की नाही. त्यासाठी पुन्हा भेटायचं ठरवलेलं आहे.

आई - मग आज काय बोललात?

आत्या - परत केव्हा भेटायचं ते. तुम्ही असेच भेटत रहा. लग्न मात्र काही करु नका.

चिंगी - तसं नाही आत्या. आम्हाला एकमेकांना समजून घ्यायला वेळ तर द्या.

आत्या - अजून किती वेळ पाहिजे तुम्हाला? वा रे यंग जनरेशन. आम्हाला स्पेस पाहिजे म्हणे स्पेस. अजून किती स्पेस देणार याना. तुला स्पेस देऊन देऊन फुगत

चालली आहेस. आता आमची स्पेसमध्ये जायची वेळ आली तरी सुद्धा यांची स्पेस काही संपत नाही.

चिंगी - आई......

आई - बरोबर आहे त्यांचं. आणि अजून एकदा भेटून एकमेकांना कसे समजून घेणार आहात?

चिंगी - ते माहीत नाही.

आई - हे असं चालणार नाही हा चिंगी. काहीतरी निर्णय घ्यावाच लागेल आणि जर लग्न करायचे असेल तरच पुन्हा भेटायचं. नाहीतर काहीही भेटायची गरज नाही.

चिंगी - अग पण.

आई - तसे मी निळे काकांना पण सांगते.

चिंगी - नको, नको. त्याना नको काही सांगु इतक्यात.

आई - का. काय झालं?

चिंगी - निळे काकांकडून त्यांना निरोप नको जायला. त्यापेक्षा मीच काय ते सांगते प्रफुलला. फोन करून.

आई - त्याआधी तू आम्हाला सांग. तुझ्या मनात काय आहे ते.

चिंगी - तसा तो चांगला आहे. पण त्याच्याशी लग्न करायचे की नाही, या निर्णयावर मी अजून पोहचली नाही.

आत्या - मग कधी पोहचणार?

चिंगी - मी सांगेन तुम्हाला. माझ्या असे मागे लागु नका. प्लिज.

असे म्हणून चिंगी तिथून निघून जाते.

आत्या - दे टाळी राधे. असं वाटतंय... तिर निशानेपे लगा हें ।

राधा आत्याला टाळी देते.

आई - कदाचित ती उद्यापर्यंत पोहचेल तिच्या निर्णयावर.
आत्या - पोहचेल तर जाईल कुठे. नाही पोहचली तर आपण निळे काकांची धमकी देऊ. मग धावत पळत पोहचेल.

असे म्हणून दोघी खुप हसतात आणि एकमेकांना टाळया देतात.

इकडे पिंट्या आणि काका घरी येतात.

काका - (हसत हसत) काय बोलली सूनबाई?

पिंट्या - अजून ती सूनबाई झालेली नाही. आणि तुम्ही तिथे होतात ना. मग?

काका - अरे मी होतो चार टेबलं लांब. मला काय ऐकु येतंय तुम्ही काय गुलु गुलु बोलतात ते. 😅☺😅☺

पिंट्या - आम्ही काही गुलु गुलु बोलत न्हवतो.

काका - अरेच्चा. मग मला कसे ऐकायला आलं नाही.

पिंट्या - तुम्ही लांब बसला होतात ना.

काका - तेच तर मी सांगतोय.

पिंट्या - तुमच्याशी जिंकणं अशक्य आहे.

काका - याचं श्रेय तुझ्या काकीला जातं. बरं का.

पिंट्या - ते कसं?

काका - ते जाऊदे. आमच्या होणाऱ्या सूनबाईचं आणि तुझं काय काय बोलणं झालं ते सांग.

पिंट्या - हो हो सांगतो. एवढी घाई काय करताय.

काका - अगदी सुरुवातीपासून सांग.

पिंट्या - दर वेळेप्रमाणें मी कॉफी मागितली. आणि

काका - दर वेळेप्रमाणें? म्हणजे किती मुलींना बोलावलं आहेस हॉटेलमध्ये आतापर्यंत?

पिंट्या - तसं नाही हो काका. मी नेहमी कॉफी मागवतो ना हॉटेलमध्ये. तसे या

वेळेस पण मी कॉफी मागवली आणि तिने ऑरेंज ज्युस.

काका - आपल्या घरी बी आहे ना संत्र्याचं झाड. लग्न झाल्यावर पाहिजे तेवढी संत्री खाऊ घालु सूनबाईला. तुझी काकी संत्र्याची वडी काय झाक बनवते माहितेय. ती बी तिला खाऊ घालु.

पिंट्या - मी काही बोलु?

काका - अरे हो. तुझं राहिलंच की. गप्प का. बोल ना पटापटा.

पिंट्या - तुम्ही मला बोलु द्याल तर ना.

काका - आता मी गप्प बसतो. तुच बोल.

पिंट्या - ऑर्डर दिल्यावर बराच वेळ आम्ही दोघेही गप्प बसलो होतो. म्हणजे साधारण पाच मिनिटं. आणि हो. एक सांगायच राहिलं. हॉटेलमध्ये आल्या आल्या तिने तुम्हाला बघितलं आणि मग मला बघितलं आणि माझ्या टेबलाजवळ आली आणि समोर बसली व म्हणाली. चांगलीच फिल्डिंग लावलेली दिसते आहे.

काका - पोरगी बिनधास्त आहे. बरं पुढे?

पिंट्या - मी म्हटलं, त्यांना घरी एकटं कुठे ठेवणार. म्हणून घेऊन आलो.

काका - तरी मी सांगत होतो, मी नाही येत. आता तिला काय वाटले असेल. या म्हाताऱ्याला घरी एकटं पण राहता येत नाही. आला कबाब मध्ये हड्डी.

पिंट्या - तसं काही नाही हो काका. तिला काहीही वाटलं नाही. तुम्ही नका विचार करु एवढा.

काका - बरं मग पुढे?

पिंट्या - पुढे काय?

काका - अरे बाबा. पुढे काय झालं?

पिंट्या - अच्छा पुढे. मग तिनेच सुरुवात केली.

चिंगी - काय विचारायचे आहे तुला.
पिंट्या - तुम्हाला कश्या टाईपचा मुलगा हवा आहे लग्न करायला.
चिंगी - ( आधी जोरात हसते). जसं मी तुला अरे तुरे करते. तसच तू मला अरे तुरे केलं तरी चालेल. आणि मला टाईप वैगेरे काही माहीत नाही. पण लग्नानंतर आमचं जुळलं पाहिजे. मतं वेगळी असली तरी एकमेकांना समजून घ्यायला पाहिजे. त्यासाठी तडजोडीची तयारी पाहिजे. एवढंच.

मध्येच काका बोलतात
काका - ती आमचं म्हणाली. आपलं नाही. का रे?
पिंट्या - माझं पुर्ण ऐकुन तर घ्या.
काका - सॉरी. पुन्हा नाही मधे मधे बोलणार.

पिंट्या - तर मग तुम्हाला वाटतं का. सॉरी, तुला वाटतं का की आपलं लग्नानंतर जुळेल. जर आपलं लग्न झालं तर.
चिंगी - माहीत नाही.

पिंट्या - आणि ते लग्न झाल्याशिवाय कळणार पण नाही.
चिंगी - पण लग्न झाल्यावर नाही जमलं तर?
पिंट्या - पुढे काय होणार ते मला सुद्धा माहीत नाही. पण पुढे काहीतरी वाईटच होईल असं गृहीत धरून चाललं तर आपल्याला पुढे जाताच येणार नाही. त्यापेक्षा पुढे काहीतरी चांगलं होईल असं गृहीत धरून पुढे पुढे चालत राहायचं. या मताचा मी आहे.
चिंगी - तू खुप आशावादी आहेस.
पिंट्या - हो.
तेवढ्यात ऑर्डर येते. वेटर ice-cream पण घेऊन येतो.

पिंट्या - काका. तुम्ही पण कधी कधी वेड्यासारखे वागता.

काका - का. काय झालं?

पिंट्या - तुम्ही वेटरला चार ice-cream आणायला सांगितलेत?

काका - हो. तुच म्हणाला होतास ना ice-cream मागवा?

पिंट्या - हो पण. एक संपल्यावर दुसरं मागवा. हे पण म्हणालो होतो. एकाच वेळेला चार मागवले तर बाकीचे विरघळून जातील.
काका - माझ्या पण ते लक्षात आले. चौथ ice-cream खाताना.
पिंट्या - तरी मयुरी म्हणाली वेटरला. एक त्याना द्या आणि बाकीचे घेऊन जा.
काका - बघ पोरीला माझी केवढी काळजी.
पिंट्या - आणि तुम्ही त्याला बोललात की. चारो मेही खानेवाला हु. तुमको कुच

प्रॉब्लेम हे क्या?
काका - हे तुम्हाला पण ऐकू गेलं?
पिंट्या - नाही म. मयुरी किती हसत होती माहितेय.
काका - अरे तो मला एकच देऊन बाकीचे घेऊन जात होता. म्हणून मी त्याच्यावर थोडासा ओरडलो. मला काय माहीत त्याला तुम्ही लोकांनी तसं सांगितलंय.
पिंट्या - थोडासा? आणि ते पण हिंदीमध्ये?
काका - माझा आवाजच तसा आहे. माझ्यामुळे तुझी लाज गेली कारे?
पिंट्या - तसं काही नाही. मयुरी समजूतदार आहे. सगळे लोकं तुमच्याकडे बघत होते. एवढंच.
काका - बघुदे. माझं जाऊदे. तुझं पुढे काय झालं?
पिंट्या - पुढे आम्ही आपाआपल ड्रिंक घेतलं आणि परत बोलायला लागलो.

पिंट्या - तुला मी पसंत आहे ना?
चिंगी - हो. आणि तुला?
पिंट्या - मला पण तू पसंत आहेस. मग आपण करायचं लग्न?
चिंगी - अजून थोडा यावर विचार करायचा का. की तुझं ठरलंय?
पिंट्या - तसं ठरलेलं नाही. म्हणून तुला विचारतोय?
चिंगी - मग आपण थोडा वेळ थांबु.
पिंट्या - चालेल.

मध्येच काका विचारतात.

काका - चालेल काय चालेल. आणि तुझं ठरलेलं नाही असं का म्हणालास?

पिंट्या - असंच. तिला अजून थोडा वेळ पाहिजे असं वाटतंय.

काका - तिला घेऊदे वेळ. तुझ्या बाजूने फिक्स आहे. असं सांगायचं ना.

पिंट्या - मला तिच्यावर प्रेशर टाकायचं न्हवतं आणि तिला पाहिजे तेवढा वेळ घेऊदे.

काका - ठीक आहे. मग पुढे?

पिंट्या - पुढे काय?

काका - अरे मग पुढे काय बोलणं झालं तुमच्यात.

पिंट्या - अच्छा ते. सांगतो ना.

पिंट्या - लग्नानंतरचे काय प्लॅन आहेत.

चिंगी - मी एकटी असल्यामुळे मला माझ्या पप्पांचा बिझनेस सांभाळायचा आहे आणि तो खुप पुढे घेऊन जायचा आहे. आणि विशेष काही नाही.

पिंट्या - चांगली गोष्ट आहे.

चिंगी - तुला चालेल ना. अर्थात जर आपलं ठरलं तर.

पिंट्या - हो. मला उलट खुप आवडेल.

चिंगी - तुझे काही प्लॅन्स आहेत का? अरे हो माझं विचारायचं राहिलंच. (हसून) तुला कश्या टाईपची मुलगी पाहिजे आणि त्या टाईपमध्ये मी बसते का?

पिंट्या - मला करिअर ओरिएंटेड मुली आवडतात आणि (हसून) त्या टाईपमध्ये तू बसतेस.

(चिंगी लाजते ). माझेपण लग्नानंतर काही खास प्लॅन नाही. माझं घर एकदा बघून घे. ताईला एकदा भेटून घे. काकांना तू भेटलीच आहेत. काकींना पण भेट. खुप चांगले आहेत सगळे.

चिंगी - ठीक आहे.

काका परत मध्येच बोलतात.

काका - तू असं तिला सांगतो आहेस की माणुस शेवटच्या क्षणाला सांगतो तसं. मी आता चाललो. तू संगळयांचा सांभाळ कर. 😊☺😊☺

पिंट्या - काका. माझी लिंक तुटली ना की मी विसरून जातो काय सांगायचे आहे ते.

काका - ठीक आहे. पुढे काय झालं

पिंट्या - थांबा. आता मला आठवु द्या. तर मग मी तिला विचारलं.

पिंट्या - तुझे काय छंद आहेत आणि तुझा दिनक्रम कसा असतो.

चिंगी - मला फिरायला खुप आवडतं. मी दर वीकेंडला कुठेतरी फिरायला जाते आणि कामाच्या संदर्भात फिरणं होतंच. मला स्वयंपाक वैगेरे काही येत नाही. पोस्ट ग्रॅज्युअशन झाल्यापासून मी पप्पांबरोबर सकाळी ऑफिसला जाते ती त्यांच्याबरोबर संध्याकाळीच घरी येते आणि शनिवार रविवार मस्त भटकंती चालु असते माझी. तुझा दिनक्रम कसा असतो.

पिंट्या - माझं पण पाच दिवस जॉब. वीकेंडला आराम. किंवा मित्रांबरोबर कुठेतरी

पार्टी नाहीतर कुठेतरी फिरायला जातो. पाच दिवस मावशींच्या हातचं जेवतो आणि दोन दिवस हॉटेल मधलं. कारण मला पण खास जेवण बनवता येत नाही.

मला गाणी ऐकायला खुप आवडतात. मी थोडीफार बासरी पण वाजवतो.

चिंगी - अरे वा. खुप छान.

पिंट्या - मग आपण पुन्हा कधी भेटायचं.

चिंगी - या शनिवारी भेटूया. तो पर्यंत आपण निर्णयांवर पोहोचु असं वाटतंय.

पिंट्या - चालेल. याच हॉटेलमध्ये संध्याकाळी सहा वाजता?

चिंगी - ठीक आहे.

पिंट्या काकांना सांगतो..

पिंट्या - बस. मला एवढंच आठवतंय.

काका - अच्छा. म्हणजे अजून लग्न करायचं आहे की नाही. इथपासून तयारी आहे तर. आजची मीटिंग फुकट गेली म्हणायची.

पिंट्या - असं नाही. आजच्या भेटीनं थोडी तरी गाडी पुढे सरकली.

काका - अशीच थोडी थोडी गाडी सरकवत गेलास तर लग्न पंच्याहत्तराव्या वर्षी होईल. आता काय तू प्रेमातच पडला आहेस. तुला सांगून काहीही उपयोग नाही. निळे भाऊंनाच काहीतरी सांगावे लागेल.

पिंट्या - निळे भाऊंना नको. मीच बोलतो मयुरीशी.

काका - ती शनिवारी म्हणाली. मला अजून वेळ पाहिजे. तर तू काय नाही म्हणणार आहेस.

पिंट्या गप्प

काका - म्हणून म्हटलं. तुला सांगून आता काहीही उपयोग नाही. निळे भाऊंशी बोलावं लागेल.

पिंट्या - मी आधी मयुरीशी फोनवर बोलून घेतो एक दोन दिवसात. मग तुम्ही बोला निळे भाऊंशी. त्याआधी त्याना काही सांगू नका.

काका - ठिक आहे. मयुरीच्या घरच्यांकडून त्याना फोन गेला नाही. म्हणजे मिळवलं.

पिंट्या - नाही जाणार.

काका - मग ठिक आहे.

दुसऱ्या दिवशी मयुरी प्रफुलला फोन लावते.

मयुरी - हॅलो प्रफुल

प्रफुल - हॅलो मयुरी. कशी आहेस.

मयुरी - मी ठीक आहे. माझ्या घरी थोडा प्रॉब्लेम झाला आहे.

प्रफुल - काय झालं.

मयुरी - आईने सांगितलं आहे की तुझ्याशी लग्न करायचे असेल तरच भेटायचं. नाही तर नाही.

प्रफुल - एवढंच ना. मला तू थोड्या वेळासाठी टेन्शनमध्ये आणलेस.

मयुरी - एवढंच ना कसं काय. आता आपल्याला पटकन निर्णय घ्यायला हवा आहे. नाहीतर परत भेटता कसे येईल.

प्रफुल - तुझ्याकडून निर्णय पक्का झाला आहे. असं वाटतंय.

मयुरी - कशावरून. आणि तुला कसे कळले.

प्रफुल - असंच ग. मला आपलं वाटतंय.

मयुरी - हो. हे लोकं जास्त घाई करत आहेत. असं नाही वाटत तुला?

प्रफुल - अग ते करणारच. मुलगी आहेस तू त्यांची.

मयुरी - काय करू तेच सुचत नाही. तुझ्याशी भेटायचं पण नाही म्हणजे.......... या विचारानेच मला कसतरी होतंय.

प्रफुल - तुझा निर्णय झाला आहे. पण तो तू मान्य करत नाही आहेस. थोडा वेळ

शांत डोळे बंद करून विचार कर. तुला नक्की काय हवंय ते. कदाचित तुला जे हवंय ते मिळाले देखील असेल. आणि जे तुला मिळालं आहे त्यात तू खुश आहे का? जर तुला त्यात आनंद वाटत असेल तर पुढे जा. नाहीतर सोडून दे. जास्त पुढचा विचार करू नकोस. मी आज आनंदी आणि खुश आहे ना. बस एवढाच विचार कर.

मयुरी - तू काय छान बोलतोस रे. ऐकत राहावंसं वाटत.

प्रफुल - थँक्स. आता मी जरा कामात आहे. आपण संध्याकाळी बोललो तर चालेल का?

मयुरी - चालेल. मी संध्याकाळी सात वाजता तुला फोन करेन.

प्रफुल - ठिक आहे. बाय.

मयुरी - बाय.

मयुरी दुपारी तीन वाजताच घरी येते.

आई - काय ग चिंगे. आज एवढ्या लवकर.

मयुरी - असंच आली.

आई - बरं. जेवण झालं का?

मयुरी - हो. मला तुझ्याशी आणि आत्याशी काहीतरी बोलायचे आहे.

आई - आत्या झोपली आहे. चार वाजता त्या उठतील. तेव्हा बोलशील की. उठवू त्यांना?

मयुरी - उठव तिला.

आई आत्याला उठवते.

आत्या - काय ग चिंगे. कशाला उठवलंस.

मयुरी - मला बोलायचं आहे.

आत्या - हा बोल.

मयुरी - तुम्हाला पसंत आहे हा मुलगा?

आत्या - कुठचा मुलगा.

मयुरी - अग हा परवाचा.

आत्या - हो. पसंत आहे. पण आम्हाला लग्न नाही करायचे. तुला करायचे आहे. तुला पसंत आहे का.

मयुरी - हो.

आत्या - मग लग्न करणार का?

मयुरी - त्यासाठीच तर तुम्हाला विचारायचं आहे.

आत्या - काय विचारायचं आहे?

मयुरी - लग्न करू की नको?

आत्या - का. तुझं ठरत नाही आहे?

मयुरी - नाही ना.

आत्या - का ठरत नाही आहे. त्याच्यामध्ये काय चांगले आहे. जे तुला आवडलं आणि काय वाईट आहे जे तुला खटकलं? ते बोटं चाटण्या व्यतिरिक्त काहीतरी बोल हं.

मयुरी - तो खुप आशावादी आहे. समजुतदार आहे. positive आहे.

आई - अरे वा. आणि तुला त्याच्यामधलं काय खटकलं.

मयुरी - काहीच नाही.

आत्या - मग तुला निर्णय घ्यायला वेळ का लागतो आहे.

मयुरी - मग हो सांगून देउ या का?

आत्या - हो. तसंपण तुझ्यासारख्या मुलीला सांभाळायला असाच मुलगा पाहिजे.

मयुरी - मी काय लहान बाळ आहे का. आणि माझ्यासारखी मुलगी म्हणजे?

आत्या - ( आईला डोळा मारून) म्हणजे तुझ्यासारखी सुंदर गं.

मयुरी - मग ठिक आहे. आणि आई तू मला नीट जेवण कसं बनवायचं ते शिकव. त्याचा बोलण्यावरून असं वाटतंय की तो बाहेरचं खाऊन खुप बोअर झाला आहे.

आई - अरे बापरे. एका मीटिंगमध्ये बराच फरक पडलेला दिसतोय.

आत्या - मग आम्ही सांगु निळे काकांना की तुच सांगते त्या मुलाला?

आई - आपणच सांगु.

आत्या - हो ना. त्यांच्याकडून पण होकार यायला पाहिजे. एकतर एवढ्या मुलांमध्ये हिने हा पहिला मुलगा पसंत केला आहे.

मयुरी - त्यांच्याकडून पण होकारच येईल.

आत्या - हो का. बरीच ओळख झालेली दिसतेय.

मयुरी लाजते आणि तेथून पळून जाते.

आत्या - राधे. एक प्रॉब्लेम झाला.

आई - आता काय झालं?

आत्या - आता तुला दोन किलोमीटर चालत जावं लागणार खंडोबाला.

आई – जाईन की. तुम्ही असालच माझ्याबरोबर.

आत्या - मी असेनच. मी रोज दोन तीन किलोमीटर सहज चालते. तू पण प्रॅक्टिस करायला घे. माझ्याबरोबर येते सकाळी चालायला उद्यापासून?

आई - उद्यापासूनच?

आत्या - अगं काय झालं?

आई - नंतर बघु.

आत्या - तुझं हे नंतर-नंतर संपव. आणि उद्यापासून चलच माझ्याबरोबर. मी उठवते तुला सकाळी पाच वाजता.

आई - सहा वाजता जाऊया का?

आत्या - ठीक आहे. सहा तर सहा.

इकडे निळे काकांचा प्रफुलच्या काकांना फोन जातो आणि होकार कळवला जातो आणि पुढच्या बोलणीसाठी कधी भेटायचं ते पण विचारले जाते आणि काका एक तासात कळवतो असे सांगतात.

काका - खुशखबर. खुशखबर. खुशखबर.....

प्रफुल - काय झालं काका. आणि असे नाचताय का?

काका - अरे माझं इथे अजून एक दिवस राहण्याचं चीझ झालं. मुलींवाल्याकडून होकार आला आहे. आता बोल.

प्रफुल - तो तर येणारच होता.

काका - म्हणजे तुला माहीत होतं?

प्रफुल - हो. पण एवढ्या लवकर येईल, असं न्हवतं वाटलं.

काका - पण तुमचं या शनिवारी परत भेटायचं ठरलं होतं ना. मग हे असं अचानक कसं घडलं?

प्रफुल मग सकाळच्या फोन बद्दल सांगतो.

काका - बरं झालं तिच्या आईने निर्णय घेतला तो. नाहीतर तुम्ही दोघे भेटतच राहिला असता आणि लग्न मात्र राहून गेलं असतं. मग आता पुन्हा केव्हा भेटायचं.

प्रफुल - आता कशाला. आता लग्न ठरल्यावरच भेटता येईल. सांगितलं ना तुम्हाला.

काका - तू अजून बाहेरच पडला नाही वाटत. अरे मुलीकडाच्याना भेटावं लागणार ना. पुढच्या बोलणी साठी.

प्रफुल - असं होय. मग ताईला विचारू. तिला कधी वेळ आहे ते.

काका - मी पण सांगतो तुझ्या काकीला.
प्रफुल - त्याना पण घेउन या.
काका - हो.

मग लग्नाचा मुहूर्त ठरतो. कुठे करायचं ते ठरतं.

लग्न ठरल्यावर दोघांना भेटायची परवानगी मिळते.
दोघे भेटतात आणि ठरल्याप्रमाणे मुहूर्तावर छान लग्न होते आणि ते दोघे छान संसार करायला लागतात. ठरल्या प्रमाणे काका त्याना गावी घेऊन जातात. संत्र्यची वडी खाऊ घालतात आणि खूप चांगला आदर सत्कार करतात.

-----------------------------------------------------------------

मित्रानो. माझी लघुकथा इथेच संपते. तुम्हाला माझी ही पहिलीच छोटीशी गोष्ट कशी वाटली ते नक्की कळवा माझ्या ई-मेल वर. माझा ई-मेल आहे.

Sachin.bijutkar@gmail.com

9820828606

Thank you very much.

लेखक – सचिन बिजुटकर

-----------------------------------------------------------------

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन
सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान